# वृत्तपत्र सुचना

डॉ.ई.बोर्जेस मार्ग, खानोलकर चौक ते पालव सदन जंक्शनपर्यंत करण्यात येणाऱ्या मोनोरेल बांधकामादरम्यान वाहन चालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नमुद ठिकाणावरील मोनोरेलचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे वाहतुकीवर २४ तास निर्बंध घालण्यात येत आहेत.

१) डॉ.ई.बोर्जेस मार्ग, खानोलकर चौक ते पालव सदन जंक्शनपर्यंतचा दोन्ही बाजूंचा मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीकरीता २४ तास प्रवेश बंद (No Entry) राहील.

२) डॉ.ई.बोर्जेस मार्ग, दक्षिण वाहिनीवरील पालव सदन जंक्शन ते खानोलकर चौकापर्यंत सर्व प्रकारची वाहतुक ही पालव सदन जंक्शन येथून जेरबाई वाडीया मार्ग–परेल टी.टी. जंक्शन–डावे वळण–आचार्य दोंदे मार्ग–खानोलकर चौक या मार्गाने वळविण्यात येणार आहे.

३) डॉ.ई.बोर्जेस मार्ग, उत्तर वाहिनीवरील खानोलकर चौक ते पालव सदन जंक्शनपर्यंत सर्व प्रकारची वाहतुक ही खानोलकर चौक येथून आचार्य दोंदे मार्ग–संत गोरा कुंभार चौक–डावे वळण–ग.द.आंबेकर मार्ग–माने मास्तर चौक–डावे वळण–जेरबाई वाडीया मार्ग–पालव सदन जंक्शन या मार्गाने वळविण्यात येणार आहे.

४) जेरबाई वाडीया मार्ग हा परेल टी.टी. जंक्शन ते पालव सदन जंक्शनपर्यंत सध्या एक दिशा मार्ग असून, जेरबाई वाडीया मार्गाने वाहतुक वळविल्यानंतर जेरबाई वाडीया मार्गावर दुतर्फा वाहतुक चालू करण्यात येणार आहे.

५) ग.द.आंबेकर मार्ग, माने मास्तर चौकापासून संत गोरा कुंभार चौकापर्यंत जड वाहनांसाठी (बी.ई.एस.टी. बसेससह) २४ तास प्रवेश बंद (No Entry) राहील.

६) खालील नमुद मार्गांवर सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास २४ तास प्रतिबंध (No Parking) राहील–

१. जेरबाई वाडीया मार्ग – परेल टी.टी. जंक्शन ते माने मास्तर चौकापर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजूस.

२. ग.द.आंबेकर मार्ग – संत गोरा कुंभार चौक ते माने मास्तर चौकापर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजूस.

वाहन चालकांच्या मार्गदर्शनासाठी वाहतुक पोलीसांकडून वर नमुद ठिकाणी मार्गदर्शक फलक लावण्यात येतील. तसेच जनतेला मदत करण्यासाठी वाहतुक पोलीसांची नेमणूक करण्यात येणार आहे. जेणेकरून वाहन चालकांना कमीत कमी गैरसोय होईल व रहदारी सुरळीत चालू राहील.

**सही/–**

**( नंदकुमार चौगुले )**
पोलीस उप आयुक्त (दक्षिण),
वाहतुक, मुंबई.